RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—ल

वर्ष ५, अंक ८(३)] सोमवार, फेब्रुवारी ११, २०१९/माघ २२, शके १९४० [पृष्ठे १५, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक १५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ फेब्रुवारी २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१.**

क्रमांक एसजीए. २०१९/प्र. क्र. १७/काम-५.—ज्याअर्थी, ज्यांची नावे यासोबत जोडलेल्या अनुसूची १ च्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेली आहेत अशा विवक्षित सुरक्षा रक्षकांना (यात यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त सुरक्षा रक्षक " असा करण्यात आला आहे), उक्त अनुसूची १ च्या स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या एका मुख्य मालकाकडे **बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा** येथे कामावर ठेवलेले आहे अशा **मे. ग्लोब सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि., कर्मा स्तंभ, एम.टी.एन.एल. ऑफीस समोर, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०८३,** मालक **श्री. श्रीनिवास रामलखन राय** यांनी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ (१९८१ चा महाराष्ट्र ५८) याच्या कलम २३ अन्वये, उक्त अधिनियमाच्या सर्व तरतुदी आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००२ (यात यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त योजना " असा करण्यात आला आहे) यांच्या अंमलबजावणीतून सूट मिळविण्यासाठी अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर आणि त्याबाबत संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाने शिफारस केल्यानुसार उक्त सुरक्षा रक्षकांना मिळत असणारे लाभ हे उक्त अधिनियमाद्वारे व त्या अधिनियमान्वये आणि उक्त योजनेद्वारे व त्याअन्वये तरतूद केलेल्या लाभांपेक्षा एकंदरीत पाहता कमी फायदेशीर नाहीत असे महाराष्ट्र शासनाचे मत झालेले आहे ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१, याच्या कलम २३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियमाच्या व उक्त योजनेच्या सर्व तरतुदींच्या अंमलबजावणीतून उक्त खाजगी सुरक्षा रक्षकांना, यासोबत जोडलेल्या अनुसूची २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीच्या अधीन राहून, नियोक्ता अभिकरण एजन्सीने मुख्य मालकासोबत केलेल्या करारपत्राच्या दिनांकापासून कलम २३ अंतर्गत सदरहू अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापर्यंत तसेच ही अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी सूट देत आहे.